# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेस नोट क्र ११७** **दिनांक- ०३/०५/२०२१**

**मिरारोड पो.ठाणे कार्यक्षेत्रात भोजपुरी फिल्म, वेब सिरीज, मॉडेलींग, फोटो शुट या क्षेत्रात काम करणाऱ्या मुलींकडून वेश्याव्यवसाय करुन घेणारे हायप्रोफाईल सेक्स रॅकेट उघडकीस. श्री.अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ यांची कारवाई.**

भोजपुरी फिल्म, वेब सिरीज, मॉडेलींग, फोटो शुट या क्षेत्रात काम करणाऱ्या मुलींना लॉकडाऊन काळात काम मिळत नसल्याने त्यांच्या आर्थिक दुर्बलतेचा व असहायतेचा फायदा घेवुन त्यांना पैशाचे प्रलोभन दाखवुन त्यांचेकडून काही इसम वेश्याव्यवसाय करुन घेत असल्याची बातमी श्री.अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, मिरारोड यांना मिळाली. त्यानुसार त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या पोलीस पथकाने दिनांक ३०.०४.२०२१ रोजी मिरारोड पो.ठाणे कार्यक्षेत्रातील मेरीयड(बिसनेस हॉटेल अॅण्ड रेस्टॉरंट) हॉटेल येथे,वेश्यादलाल आले असता, सापळा रचून प्रत्येकी १ लाख रुपयाच्या मोबदल्यात पिडीत मुलींकडून वेश्याव्यवसाय करुन घेणाऱ्या २ दलालांना रंगेहात पकडून त्यांचे ताब्यातून भोजपुरी फिल्म, वेब सिरीज, मॉडेलींग, फोटो शुट या क्षेत्रात काम करणाऱ्या ५ मुलींची सुटका करुन त्यांची रेस्क्यु होममध्ये रवानगी करण्यात आलेली आहे.

या प्रकरणी १) रामरतन नवरतन करवा वय ३० वर्षे, रा. रुम.नं. ३०८, बिल्डींग नं.३, शालीबद्रा अपार्टमेंट तलाव रोड, भाईंदर पुर्व जि.ठाणे, २) परबत माना चामरिया वय ४२ वर्षे, रा. रुम.नं. २०३, भुमी रेसीडेन्सी, कुरार व्हिलेज, आस्था हॉस्पीटज बिल्डींग, मालाड पुर्व मुंबई यांचेविरुद्ध मिरारोड पो.ठाणे गुरनं. I १८४/२०२१ कलम ३७०, ३४ भादंवि. सह कलम ३, ४, ५, ७ अनैतिक व्यापारास प्रतिबंध कायद्यान्वये दिनांक ०१.०५.२०२१ रोजी गुन्हा नोंद करुन त्यांना अटक करण्यात आलेली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोनि.सचिन कोतमिरे, मिरारोड पो.ठाणे हे करीत आहेत.

सदरची कारवाई श्री.अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जिलानी सय्यद, सहा.पोलीस निरीक्षक दत्तुसाहेब लोंढे, पोहवा.अजय मांडोळे, पोना.संदीप शेळके, पोना.अंकुश पाटील, पोकॉ.हरीश्चंद्र कांबळे, मपोना विजेता नाईक, मपोशि.लतादेवी एक्कलदेवी यांनी केली आहे.

Scanned with CamScanner